आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२३ ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी जळगाव इथल्या कार्यक्रमात ११ लाख लखपती दीदींशी संवाद साधणार
- राज्य शासनाच्या मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये महिलांचं महाशिबिर
- शरीरावर विपरीत परिणाम करणाऱ्या १५६ औषधांवर बंदी
- पृथ्वी-दोन या आण्विक क्षमतेच्या बॅलिस्टीक क्षेपणास्त्राची आणखी एक चाचणी यशस्वी

  **आणि**
- धुळे जिल्ह्याला आज हवामान विभागाचा रेड अलर्ट

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी जळगाव इथं येणार आहेत. त्यावेळी ११ लाख लखपती दीदींना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहेत. वर्षाला एक लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न कमावणाऱ्या लखपती दीदींबरोबर ते यावेळी संवाद साधतील. राज्यातल्या स्वयंसहाय्यता गटांसाठी अडीच हजार कोटी रुपयांचा फिरता निधी जारी करतील. तसंच पाच हजार कोटी रुपयांचं बँक कर्ज जारी करतील. या फिरत्या निधीचा फायदा २ लाख ३५ हजार चारशे स्वयंसहाय्यता गटांच्या सुमारे २५ लाख ८० हजार सदस्यांना मिळणार आहे. ३४ राज्यांमधल्या जवळजवळ ३० हजार ठिकाणांहून या कार्यक्रमात लखपती दीदी दूरदृष्यप्रणाली द्वारे सहभागी होणार आहेत. आतापर्यंत एक कोटी लखपती दीदी

झाल्या असून येत्या ३ वर्षात ही संख्या ३ कोटीवर जाईल अशी माहिती ग्रामविकास मंत्रालयाने दिली आहे.

<><><><><>

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानाअंतर्गत आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये महिलांचं महाशिबीर होत आहे. यात जिल्ह्यातून पन्नास हजार महिला सहभागी होतील असा अंदाज आहे. कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे देखील उपस्थित राहणार आहेत. पंचवटीत तपोवन इथल्या सिटीबस लिंक डेपो शेजारच्या मैदानात हा मेळावा होणार असून तिथे महिलांसाठीच्या कल्याणकारी योजनांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. जिल्हा प्रशासनानं महाशिबिराची जय्यत तयारी केली असून महिलांना कार्यक्रम स्थळी आणण्यासाठी राज्य परिवहन महामंडळ आणि नाशिक महापालिकेच्या सुमारे ५०० बसगाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं नुकतंच ओझर विमानतळावर आगमन झालं असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील त्यांच्या समवेत आहेत.

<><><><><>

बदलापूरमध्ये दोन विद्यार्थिनींच्या लैंगिक शोषण प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीनं उद्या पुकारलेला बंद हे विकृतीविरोधातलं आंदोलन असल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. दुपारी दोन वाजेपर्यंत

बंद पाळणार असून  या बंददरम्यान रुग्णवाहिका, वृत्तपत्रं, अत्यावश्यक सेवा सुरू राहतील, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मर्यादित क्षेत्रावर शेती करण्याची स्थिती निर्माण झाली असल्यानं आधुनिक शेतीशिवाय पर्याय नाही, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते काल नव्या मुंबईत वाशी इथं संभाजी ब्रिगेडच्या २७ व्या राज्यस्तरीय अधिवेशनात बोलत होते.

शेत जमीन कमी होत असतानाच दुसर्या  बाजूला शेतीवर बोजा वाढत चालला आहे. त्यामुळे यशस्वीरित्या शेती करायची असेल तर आधुनिकतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शेतीच्या क्षेत्रात संशोधन होत आहे त्याचा आधार घेऊन उत्पादकता वाढवणं आणि शेती करत असताना त्याला जोड देणं आवश्यक आहे, असं ते म्हणाले.

नव्या पिढीनं अर्थकारणाला महत्त्व दिलं पाहिजे. उद्योग, व्यवसाय काहीना काही तरी केलं पाहिजे. काम मागणारे अनेक असतात काम देणारे तयार करायचे आहेत. ही पिढी तयार करण्यासाठी दृष्टीकोन, विचारधारा बदलण्याची गरज असल्याचं शरद पवार म्हणाले.

आपल्याला झेड प्लस सुरक्षा का दिली आहे, याबद्दल आपल्याला काही माहित नसल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

शरीरावर विपरीत परिणाम करणाऱ्या १५६ औषधांवर केंद्र सरकारनं बंदी घातली आहे. यात प्रतिजैविकं, वेदनाशामक आणि जीवनसत्वांच्या औषधांचा समावेश आहे. बंदी घातलेल्या १५६ औषधांमध्ये काही अनुचित मिश्रण असल्याचं

निदर्शनास आलं असून  यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, असं केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

सरकार आणि औषध तांत्रिक सल्लागार मंडळ-DTAB यांच्या विशेष समितीनं केलेल्या तपासणीनंतर हा निर्णय घेतल्याचंही अधिसूचनेत म्हटलं आहे. या समितीनं केलेल्या तपासात ही औषधे रुग्णासाठी अपायकारक असल्याचं आढळून आल्याचंही म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११३ वा भाग असेल.

<><><><><>

पृथ्वी-दोन या आण्विक क्षमतेच्या बॅलिस्टीक क्षेपणास्त्राची आणखी एक चाचणी काल यशस्वी झाली. रात्री ओदिशातल्या समुद्रकिनाऱ्यावर ही चाचणी झाली. डीआरडीओ म्हणजे संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने विकसित केलेलं हे क्षेपणास्त्र ५०० ते एक हजार किलोग्रॅम वजनाचा शस्त्रभार घेऊन जाऊ शकते. पृष्ठभागावरुन साडेतीनशे किलोमीटर पर्यंत मारा करु शकणाऱ्या पृथ्वी-दोन ला दोन इंजिनं लावली आहेत. या चाचणीच्या वेळी डीआरडीओचे अधिकारी तसंच वैज्ञानिक  उपस्थित होते.

<><><><><>

पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन आज साजरा होत आहे. भारतीय चांद्रयान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर गेल्या वर्षी याच दिवशी उतरलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने अंतराळ क्षेत्रातल्या प्रगतीमधे  दिलेल्या योगदानाचा गौरव केला. यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते इस्रोच्या रोबोटिक चॅलेंज आणि भारतीय अंतरिक्ष हॅकेथॉनच्या विजेत्यांना परितोषिके प्रदान करण्यात आली.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी समाजमाध्यमातल्या संदेशातून देशवासियांना पहिल्या राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पहिल्या राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. आजचा दिवस भारतीय अंतराळ शास्त्रज्ञांच्या योगदानाची प्रशंसा करण्याचा आहे. सरकारनं या क्षेत्राशी संबंधित दूरदृष्टीचे निर्णय घेतले आहेत आणि आगामी काळातही घेऊ असं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पोलंडचा दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज युक्रेनची राजधानी कीव्ह इथं पोहोचले. कीव्हमधल्या भारतीय समुदायानं त्यांचं उत्साहात स्वागत केलं. त्यानंतर मोदी यांनी कीव्हमधल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यावर फुलं वाहून श्रद्धांजली अर्पण केली.  प्रधानमंत्री आज युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याबरोबर चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेत उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी अध्यक्षपदाची निवणूक लढवण्याचा प्रस्ताव औपचारिकरीत्या स्वीकारला आहे. शिकागो इथं डेमोक्रॅटिक पक्षाच्या मेळाव्यात काल त्यांनी ही घोषणा केली. अमेरिकनांना एकत्र आणणंआणि अमेरिकेच्या भविष्यासाठी लढणं हेच आपलं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांनी अध्यक्षपदाच्या शर्यतीतून माघार घेताना डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार म्हणून भारतीय वंशाच्या कमला हॅरिस यांचं नाव जाहीर केलं होतं. हॅरिस निवडणुकीत यशस्वी झाल्यास त्या अमेरिकेच्या पहिल्या महिला अध्यक्ष ठरतील.

**<><><><><>**

एक पेड मां के नाम या मोहिमेअंतर्गत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज मुंबईत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात वृक्षारोपण केलं. राष्ट्रीय उद्यानात पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विविध उपक्रम राबवण्यासंदर्भात त्यांनी बैठक घेतली. तुलसी आणि विहार या तलावांची माहिती घेऊन मुंबईतल्या पाणी पुरवठ्याच्या समस्येवर उपाय करण्याबाबतही गोयल यांनी सविस्तर चर्चा केली.

यंदाच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ‘एक पेड मां के नाम’ ही मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमांतर्गत देशभरात वृक्षारोपण मोहिमेत लोक उत्साहाने सहभागी होत आहेत. नवी दिल्लीतल्या आकाशवाणी भवन परिसरात आज आकाशवाणीच्या महासंचालक मौसमी चक्रवर्ती आणि अतिरिक्त महासंचालक एल. मधु नाग यांनी वृक्षारोपण केलं. या मोहिमेत आकाशवाणीच्या अन्य अधिकाऱ्यांनाही सहभाग घेतला.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्याला आज हवामान विभागाने रेड अलर्ट दिला असून जिल्ह्यात आज दुपार पासून जोरदार पाऊस होत आहे, काल रात्री देखील मुसळधार पाऊस झाला. पावसामुळे धुळे आणि साक्री तालुक्यातल्या जल प्रकल्पांमध्ये पाण्याची पातळी वाढली आहे. प्रामुख्याने मालनगांव, पांझरा, जामखेली प्रकल्प भरले असून त्यातून पाण्याचा विसर्ग होत आहे. अक्कलपाडा धरणातूनही आज दुपारी २४०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे, तो आणखी वाढू शकतो. पांझरा नदीला पुन्हा एकदा पूर आला असून नदीकाठच्या नागरीकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**<><><><><>**